P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - ३०/०५/२०२३

## दि.२९/०५/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे २५३/२०२३ भादवि कलम ३०७,५०४,५०६, आर्म अँक्ट ४/२५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२८/५/२०२३ रोजी २२/३० वा. सुमा डाळ आळी ६५/२३ रणजित सिंग दाभाडे नगर तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक २९/०५/२०२३ रोजी ०५.११ वा |
| फिर्यादी | :- | अंकुश रमेश कांबळे वय २५ वर्ष व्यावसाय - मजरी रा. डाळ आळी ६५/२३ रणजित सिंग दाभाडे नगर तळेगाव दाभाडे ता.मावळ जि. पुणे |
| आरोपी | :- | सुरज नागनाथ तुपसुंदरे वय २८ वर्षे रा. दळवी नगर झोपडपट्टी रेल्वे लाईन चिंचवड पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने फिर्यादी यांचे आईला शिवीगाळ करत असल्याचा जाब फिर्यादीने विचारल्याच्या कारणावरुन चिडुन जावुन फिर्यादीचे अंगावर धावुन येवुन शिवीगाळ करत तुला जिवंत सोडत नाही असे म्हणत आरोपीने त्याच्या हातातील चाकुने फिर्यादीचे गळ्याच्या उजवी बाजुस वार करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि साळी ९४०५४०४३४४ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | म्हाळुंगे एमआयडीसी २९२/२०२३ भादवि कलम २७९,३३७,३३८,३०४ (२),४२७ सह मो वा का कलम १८४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २७.०५/२०२३ रोजी १७.३० वा मौजे वासुली गावचे हद्दीत, यश लेझरटेक इंडीया प्रा (यश फॅबटेक) .लि . कंपनी समोर, भामचंद्रनगर ते सदुंबरे गावकडे जाणारे एमआयडीसीचे अंतर्गत रोडवर ता पुणे.खेड जि . |
| गुन्हा दाखल | :- | दि २९/०५/२०२३ रोजी २२.३२ वा |
| फिर्यादी | :- | सुभाष कांतीलाल पवार पोलीस हवालदार ब नं. २४ नेमणुक महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय |
| आरोपी | :- | आयशर नंएच. .एम . ०४/ एफ .पी.५७०५ ही वरील अज्ञात चालक |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी आयशर नंएच. .एम . ०४/ एफ .पी.५७०५ ही वरील अज्ञात चाल काने त्याचे ताब्यातील सदरचे वाहन हयगयीने , निष्काळजीपणे कंपनीचे गेट मधुन बाहेर घेत असताना भामचंद्रनगर बाजुकडुन सदुंबरे एफ झेड मोटार सायकल नं .एच.एम .१४/ जी .क्यु.५८९४ हीस धडक देवुन अपघात करून अपघातात मोटार सायकल स्वार भुषण नवनाथ गायकवाड वय २० वर्ष, रा पुणे याचे हातापायास व डोक्यास .खेड जि .शिंदेगाव ता . किरकोळ व गंभिर दुखापती होवुन त्याचा मृत्यु होणेस, तसेच वाहनाचे नुकसाणिस कारणीभुत होवुन , अपघातात जखमीचा मृत्यु होईल याची जाणिव असताना देखिल जखमीस उपचारास न नेता व सदर अपघाताची खबर न देता अपघात ठिकाणा वरून त्याचे ताब्यातील वाहनासह पळुन गेला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि चव्हाण ९६६५५१४०२४ |

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- म्हाळुंगे एमआयडीसी २९०/२०२३ एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क),२०(ब)(ii)(ब), २९

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. २८/०५/२०२३ रोजी १९.०० वा.चे सुमा.पाईट ते वांद्रेगांवाकडे जाणाऱ्या रोडचे कडेला मौ. सुपे गांवातील मुक्ताई मंदीराचे समोर

गुन्हा दाखल :- दि. २९/०५/२०२३ रोजी ०४:४९ वा.

फिर्यादी :- कपिलेश कृष्णा इगवे, वय ३२ वर्षे, पोलीस शिपाई, ब. नं. २७१२, अंमली पदार्थविरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालय,

आरोपी :- १) विकास रोहीदास बदाले वय २७ वर्ष रा. बदालेवाडी, मु.पो.नवलाख उंबरे, तळेगांव एमआयडीसी, ता.मावळ. जि.पुणे,२) शिवाजी वसंत भोसले वय ३६ वर्ष रा. मु. पो. करंजविहीरे, ता. खेड जि. पुणेव
३) लक्ष्मण निवृत्ती कुंभार वय ३७ वर्ष रा. मौ. सुपे पो. अंबोलीता. खेड जि. पुणे
४) विशाखापट्टनम येथील इसम नामे गिरीबाबा संपुर्ण नाव व पत्ता सांगता येत नाही मो.क्र. ८५८३९४२६१०
**आरोपी क्र १ ते ३ अटक आहे**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी क्र १ व २ हे त्यांचे ताब्यात २,५२,१५०/- रुपये किंमतीचा १० किलो ८६ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ व आरोपी क्र ३ हा त्याचे ताब्यात १,३४,१००/- रुपये किंमतीचा ०५किलो ३६४ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ अवैधरित्या बाळगताना व बेकायदेशीर स्वतःचे फायद्याकरीता व्यवहार करताना मिळुन आले. अ.क्र. ३ याचेकडे मिळुन आलेला गांजा हा त्याने अ.क्र. १ व २ यांचे कडुन विकत घेतला असुन अ.क्र. १ व २ यांचे ताब्यात मिळुन आलेला गांजा हा विशाखापट्टनम येथील आरोपी क्र ४ याचेकडुन आणला असल्याचे सांगितले. अ.क्र. १ ते ३ यांचेकडुन एकुण ०४,०१,२५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल ज्यामध्ये एकुण १५ किलो ४५० ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या विक्री करीता कब्जात बाळगताना मिळुन आला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि चव्हाण ९७६२१०१३६३

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- दिघी २३५/२०२३ भा.द.वि.कलम ३७६,३७६ (२)(एन), ३५४(अ),३२५,३२३,५०४,५०६,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- माहे जुन २०२० ते दि.१३/०५/२०२३ पर्यत १) लॉज आळंदीरोड,दिघी तालुका हवेली, जिल्हा पुणे,येथे व दि.२२/०४/२०२३ रोजी व दि.१३/ ०५/२०२३ रोजी ०२) कोरगाव पार्क पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.२९/०५/२०२३ रोजी ००.३२ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- १)विकास राजेंद्र पवार वय २८ वर्षे २) महिला आरोपी ३)बाळु राजेंद्र पवार, ४)महिला आरोपी रा.सदर ५)महिला आरोपी
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी क्र १ याने फिर्यादी बरोबर दि.०५/०५/२०२० रोजी साखरपुडा झाल्या नंतर सानवी लॉज आळंदी रोड,दिघी तालुका हवेली, जिल्हा पुणे,येथे लग्न करतो असे म्हणुन जबरदस्ती शारीरीक संबध केले,फिर्यादीने आरोपी क्र १ ला लग्न करण्याची मागणी केली असता लग्न केले नाही,व लग्नाचे अमीश दाखवुन फिर्यादी बरोबर वारंवार जबरदस्ती शारीरीक संबध केले, तसेच फिर्यादीची छाती खुप मोठी आहे, तु कोणा सोबत झोपायला जातेस असे म्हणुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न केली, व दि.२२/०४/२०२३ रोजी फिर्यादीचे मामाचे घरी येथे यातील आरोपी क्र ४ हीने फिर्यादीचे उजव्या हातावर खलबत्ता मारुण हात फ्रॅक्चर केला, व आरोपी क्र १ ची आई आरोपी क्र २, भाऊ आरोपी क्र ३ व आरोपी क्र १ यांनी फिर्यादीला हाताने मारहाण व शिवीगाळ केली, तसेच दि. १३/०५/२०२३ रोजी फिर्यादीची बहीण व आई यांना फिर्यादीचे लग्नाचे कारणा वरुण नमुद आरोपी यांनी हाताने मारहाण केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि शिखरे ८८५५०४७६९५

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ५१८/२०२३भा.दं.वि. कलम ३५४, ५०४, ३४ प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दिनांक २८/०५/२०२३ रोजी सकाळी ११/०० वा. चे सुमारास प्रिस्टीन ग्रँनडियर सोसायटी, शेख वस्ती शेजारी, शंकर कलाटे नगर, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे येथील सिक्युरिटी कॅबिनमध्ये.

गुन्हा दाखल :- दि. २९ /०५/२०२३ रोजी ०२ / २६ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- १) अंकित गुप्ता, २) महिला आरोपी
३) महिला आरोपी सर्व रा. प्रिस्टीन ग्रँनडियर सोसायटी, शेख वस्ती शेजारी, शंकर कलाटे नगर, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे सोसायटीचे कॅबिनमध्ये त्यांचेच सोसायटीमधील आरोपी मजकुर फिर्यादी यांचेकडुन कुत्र्याचे अंगावरुन गाडी गेल्याचे सी.सी.टी.व्ही. पाहत असताना फिर्यादी या देखील सी.सी.टी.व्ही. पाहत असताना आरोपी क्रं १ व २ यांनी फिर्यादीच्या खांद्यास धक्का देवुन त्यांना माघे ढकलत म्हणाले, बावळट आहेस काय? गाडीखाली कुत्रा आला आणि तुला समजले कसे नाही. असा कोण विश्वास करेल तुझ्या बोलण्यावर, तु काय दारु पिवुन गाडी चालवत होती काय?" असे म्हणुन आरोपी क्रं १ व २ यांनी पुन्हा फिर्यादीचे खांद्यास व दंडास हात लावुन मागे ढकलले म्हणुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न झाली. त्यावेळी फिर्यादी यांना पोलीसांनी वाकड पोलीस स्टेशन येथे गाडी घेवुन येण्यास सांगितले. त्यावेळी आरोपी मजकुर यांनी फिर्यादीस शिवागीळ केली. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि जाधव ७५०७४५५२९४

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी २५०/२०२३भा.दं.वि. कलम ३०६, ४९८(अ),३२३,५०४,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दिनांक २८/०५/२०२३ रोजी १९/४५ वाजता पत्ता लेन नंबर ०५, राजीव गांधीनगर, पिंपळे गुरव, पुणे ६१

गुन्हा दाखल :- दिनांक २९/०५/२०२३ रोजी, २३/२९ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- १.महिला आरोपी
२.महिला आरोपी
३.महिला आरोपी
पत्ता तिघीही लेन नंबर ०५, राजीव गांधीनगर, पिंपळे गुरव, पुणे.
**आरोपी अटक नाहि**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची मोठी बहीण वय २८ वर्षे हीस गेली पाच ते सहा वर्षापसुन आरोपी क्र १ ते ३ यांनी तिस ती पुण्याला राहावयास आल्यापासुन घरातील छोट्या-छोट्या किरकोळ कारणांवरुन, कपडे घालण्यावरुन, केस विंचरण्यावरुन, इतरांशी बोलण्यावरुन, नेहमी जाच करुन, मानसीक व शारीरीक त्रास देऊन, शिवीगाळ आणि मारहाण करुन आत्महत्त्येस प्रवृत्त केल्याने व तिने तिच्या राहते घरी ओढणीच्या सहाय्याने सिलींग फॅनला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि कदम ९९२२१०७३९९

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- दिघी २३७/२०२३ भा. द. वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२७/०५/२०२३ रोजी २३.१५ वा चे सुमा. विजयनगर येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मैदानावर, दिघी, पुणे याठिकाणी

गुन्हा दाखल :- दि.२९/०५/२०२३ रोजी २०/४५ वा.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :- | यासिन अशिष चिट्टपरम, वय २४ वर्षे, व्यवसाय-नोकरी, रा. स. नं. ०२, गायकवाडनगर, कृष्णादिप बिल्डींग, फ्लॅट नं. ०५, दिघी, पुणे |
| आरोपी | :- | बापू परांडे, वय ३२ वर्षे, रा. परांडे होम्स, दिघी, पुणे<br>**आरोपी अटक नाहि** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी तसेच इतर मुले क्रिकेट खेळत असताना तालीफ शेख बॉलींग करत होता आणि फिर्यादी हे किपरींग करत होते तसेच आरोपी हा ले अंम्पायरींग करत होता, त्यावेळी तालीफ याने बॉल टाकला असता आरोपी याने नो बॉल दिला, तेव्हा फिर्यादी त्याला म्हणाले की, तो नो बॉल नाही वन बाऊंन्स आहे असे म्हणताच आरोपी यांनी चिडून जावून फिर्यादी यांना लाथाबुक्यांनी व हाताने मारहाण करून शिवीगाळ करून शर्ट फाडून नुकसान करून तु दिघीमध्ये रहायचे नाही अशी धमकी देवून तो तेथून निघून जावून नंतर ११.३० वा परत फिर्यादीचे जवळ येवून त्यांना त्याने दगड फेकून मारला परंतु तो लागला नाही नंतर त्याने त्याचेकडील कारमधील लाकडी हॉकीस्टीक काढून सदर स्टीकने फिर्यादीचे पाठीवर, डाव्या खांदयावर, कंबरेवर, डाव्या हातावर मारून जखमी करून तु जर यापुढे दिघीमध्ये दिसला तर तु मरणार अशी धमकी दिली आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा आव्हाड ९०४९९८९८४६ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ५१७/२०२३, भा.दं.वि. कलम ४२९, २७९ मो.वा.का.कलम १८४, १३२(१)(क), प्राण्यांना क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९६० चे कलम ११(२)(क) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक २८/०५/२०२३ रोजी पहाटे ०५/०० वा. चे सुमारास प्रिस्टीन ग्रॅनडियर सोसायटी, शेख वस्ती शेजारी, शंकर कलाटे नगर, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे चे समोर |
| गुन्हा दाखल | :- | दि. २९/०५/२०२३ रोजी ०१ / १९ वा. |
| फिर्यादी | :- | अंकित सुरेंद्र गुप्ता,वय-३३ वर्षे, धंदा- नोकरी, रा. प्रिस्टीन ग्रॅनडियर सोसायटी, बि विंग, फलॅट नं-१००१, शेख वस्ती शेजारी, शंकर कलाटे नगर, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे, |
| आरोपी | :- | महिला आरोपी<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादीचे सोसायटीने पाळलेला शेरू नावाचा कुत्रा हा सोसायटीच्या गेटच्या समोरील रस्त्यावर झोपला असताना, त्यांचेच सोसायटीमधील रहिवासी नमुद आरोपी यांनी त्यांची पांढ-या रंगाची स्विफ्ट डिझायर गाडी, तिचा आरटीओ नंबर MH 15/DS 0716 ही बेदरकारकपणे व हयगयीने चालवून क्रुरपणे कुत्र्याचे अंगावर गाडी घालुन त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन त्यानंतर सिक्युरिटी गार्ड तपन यांनी थांबण्यास आवाज देऊन देखील न थांबता त्यांचे गाडीसह तेथून निघून गेले आहेत. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि जाधव ७५०७४५५२९४ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी २३६/२०२३ भा. द. वि कलम ३०८, ३२४, ५०४, ३५२, ५०६(२), १४३, १४७, १४९ भारतीय हत्यार अधिनियम कलम ४(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५, क्रिमिनल लॉ ॲमेंटमेंट ॲक्ट कलम ७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ता. २८/०५/२०२३ रोजी २२.१५ वा चे सुमारास विजयनगर येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मैदानामध्ये, दिघी, पुणे याठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि.२९/०५/२०२३ रोजी १४/१७ वा. |
| फिर्यादी | :- | गुलाब बबन परांडे, वय ३५ वर्षे, व्यवसाय-व्यापार, रा. काटेवस्ती, कृष्णाई निवास, तळमजला, कोकण मराठा संघ कार्यालयाजवळ, दिघी, पुणे |
| आरोपी | :- | १)पप्या चिट्टपुरम, वय २२ वर्षे, रा. दिघी, पुणे<br>२)रोहित उदयराज सिंग, वय २१ वर्षे, रा. दिघी, पुणे |

३)यासिन चिट्टपुरम, वय २२ वर्षे, रा. दिघी, पुणे
दोन इसम त्यांचा नांव व पत्ता माहित नाही.
**आरोपी क्र २ व ३ अटक आहे**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी व  तसेच इतर मुले विजयनगर, दिघी, पुणे येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मैदानामध्ये क्रिकेट खेळत असताना आरोपी क्र १ व २ इतर दोन इसम असे त्यांचे हातामध्ये लोखंडी कोयते घेवून मैदानामध्ये आले आणि फिर्यादी यांना म्हणाले की, क्रिकेट बंद करा, बापूला बोलावा त्याचा मर्डर करणार आहोत. त्याला मारुन टाकणार आहोत असे म्हणून त्यांनी स्टंप हातामध्ये घेतले, आणि बॅट सुध्दा ताब्यात घेतल्या. नंतर फिर्यादी सदर इसमांनी ताब्यात घेतलेले स्टंप व बॅटी घेण्यासाठी गेले तेव्हा ते देत नव्हते, त्यांतील काही जण फिर्यादी यांना मारण्यासाठी अंगावर धावत होते, तसेच एकाने फिर्यादीचे गंचुडे पकडून फिर्यादी यांना मारून टाकण्याची धमकी दिली. त्यानंतर ते चार इसम विशाल हिवराळे व कुणाल हिवराळे यांचेकडे गेले आणि त्यांना म्हणाले की, तुम्ही बापू पंराडेला काल मदत केली असे म्हणून त्यांनी विशाल व कुणाल यास स्टंपने मारणार तेवढयात फिर्यादी हे सदर ठिकाणी गेले तेव्हा तो स्टंम्प फिर्यादीचे डोक्यात उजव्या बाजूला लागला त्यामुळे फिर्यादीच्या डोक्याला टेंगुळ आले. आरोपी क्र ३ ने सुध्दा फिर्यादी यांना शिवीगाळ करून धमकी देवून आरोपी क्र १ ते ३ व तसेच इतर दोन इसम तेथून फिर्यादी यांना धमकी देत हातात कोयते फिरवत दहशत माजवत निघून गेले. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि खंडाळे ८३२९४८४८५६